महासागर नागपूर

पान ३ आॅरेंज सिटी

मंगळवार, दिनांक २९ जून २०२२

# बाबासाहेबांचे विचार प्रत्येकापर्यंत पोहोचावे

## उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांचे प्रतिपादन

**नागपूर.** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर थोर विचारवंत होते त्यांचे विचार जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीचे अध्यक्ष उदय सामंत यांनी केले. मंगळवारी रत्नागिरी येथील स्वातंत्र्यवीर सावरकर नाट्यगृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीच्या एकूण सहा ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी ते दूरदृश्य प्रणालीद्वारे बोलत होते.

कार्यक्रमाला पालकमंत्री आणि समितीचे सदस्य डॉ. नितीन राऊत हे दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. इंदुराणी जाखड, अपर जिल्हाधिकारी संजय शिंदे, त्रशिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. संजय जगताप, निवासी उपजिल्हाधिकारी सुशांत खांडेकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीचे सदस्य सचिव डॉ. प्रदीप आगलावे, ग्रंथांचे अनुवादक आर.के. क्षीरसागर, आनंदराव आंबेडकर, डॉ. राजेंद्र गवई, डॉ. प्रकाश बच्छाव, डॉ. सुरेंद्र धातोडे, प्राध्यापिका सुषमा अंधारे, योगीराज बागुल, सिध्दार्थ खरात, कमलाकर पायस, डॉ. संभाजी बिरांजे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहा ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले. प्रास्ताविक समितीचे सदस्य सचिव डॉ. प्रदीप आगलावे यांनी केले.

# १४ वर्षांच्या बालिकेवर अत्याचार

**नागपूर,** क्राईम रिपोर्टर. एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळ्यात अडकवून तरुणाने तिचे वारंवार लैंगिक शोषण केले. लग्नासाठी दबाव टाकला असता जात आणि समाजाचे कारण सांगून लग्नास नकार दिला. ही घटना कोराडी ठाण्यांतर्गत उघडकीस आली आहे. पोलिसांनी पीडितेच्या तक्रारीवरून आरोपी तरुणावर गुन्हा नोंदविला आहे. सुनील दशरथ कछवा (२३) रा. फुलेनगर, महादुला असे आरोपीचे नाव आहे.

पीडित बालिका दहाव्या वर्गात शिकते. तिच्या घरा शेजारी राहणाऱ्या महिलेच्या घरी सुनीलचे येणे-जाणेहोते. या दरम्यान दोघांमध्ये ओळख होऊन मैत्री झाली. दोघांच्याही भेटीगाठी सुरू झाले आणि मैत्रीचे प्रेमसंबंधात रुपांतर व्हायला वेळ लागला नाही. गत २४ जूनला दोघेही कोराडी देवी मंदिराजवळ पोलिसांना दिसले. पोलिसांनी पीडितेला विचारपूस केली, मात्र त्यावेळी तिने काहीही सांगितले नाही. अल्पवयीन असल्याने पोलिसांनी तिच्या कुटुंबीयांना ठाण्यात बोलावले आणि सोबत घेऊन जाण्यास सांगितले. यावेळी तिचे सुनीलशी प्रेमसंबंध असल्याचा खुलासा कुटुंबीयांसमोर झाला. पीडिता कुटुंबीयांसह जाण्यास तयार नव्हती. त्यामुळे तिला शासकीय वसतिगृहात ठेवण्यात आले. सोमवारी तिला बाल कल्याण समितीसमोर हजर करण्यात आले. समितीला दिलेल्या जबानीनुसार, तिचे सुनीलशी प्रेमसंबंध होते. मार्च महिन्याच्या शेवटी सुनील तिला शाळेत भेटायला आला आणि आपल्या मामाच्या घरी घेऊन जात जबरीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. तिने विरोध केला असता मारहाण केली. त्यानंतर तो तिचे सतत शारीरिक शोषण करू लागला. पीडितेने त्याला लग्नाबाबत विचारले असता तू दुसऱ्या जातीची असल्याचे सांगून स्पष्ट नकार दिला. पीडितेने सुनीलवर कारवाईची मागणी केली. तिने दिलेल्या जबानीच्या आधारावर कोराडी पोलिसांनी सुनीलवर लैंगिक अत्याचार, पोक्सो आणि अॅट्रॉसिटी अॅक्टच्या कलमान्वये गुन्हा नोंदवून त्याला अटक केली. प्रकरणाचा तपास एसीपी संतोष खांडेकर करीत आहेत.

# चारित्र्यावरील संशयातून पत्नीची हत्या

**नागपूर,** क्राईम रिपोर्टर. पत्नीच्या चारित्र्यावर असलेल्या संशयातून एका व्यक्तीने आपल्या चिमुकल्या मुलांसमोरच तिच्यावर चाकूने सपासप वार करून ठार मारले. ही थरारक घटना मंगळवारी दुपारी सोनेगाव ठाण्यांतर्गत शिवणगाव फाट्यावर घडली. अंकिता सचिन भगत (२६) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. पोलिसांनी आरोपी पती सचिन भीमराव भगत (३१) ला अटक केली आहे.

अंकिताचे कुटुंब मुळचे कारंजा घाडगे येथील रहिवासी आहे, तर सचिन घुघ्घुस येथील रहिवासी आहे. ९ वर्षांपूर्वी तो कोंढाळी येथील एका स्फोटके बनविणाऱ्या कंपनीत कामाला होता. गावातील एका मुलाच्या माध्यमातून त्याची ओळख अंकिताशी झाली. दोघांनाही एकमेकांशी प्रेम झाले आणि कुटुंबाच्या विरोधात जाऊन ८ वर्षांपूर्वी त्यांनी प्रेमविवाह केला. तेव्हापासून ते बुटीबोरीच्या टाकळघाट परिसरात राहात होते. त्यांना श्रवण (६) आणि श्लोक (३) नावाची दोन मुले आहेत.

### आता मुलांचे काय होणार ?

क्षणिक रागात मागचा पुढचा कोणताही विचार न करता सचिनने पत्नीची हत्या केली. या प्रकरणात पोलिसांनी त्याला अटकही केली. मात्र आता त्याच्या दोन्ही मुलांचे काय होणार असा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. ज्या वयात आई-वडिलांची मुलांना अधिक गरज असते त्याच वयात दोघांचेही छत्र त्यांच्यावरून हरपले आहे. दोन्ही मुले आई-वडिलांच्यप्रेमापासून वंचित झाली आहेत. पोलिसांनी सचिनच्या कुटुंबीयांना घटनेची माहिती दिली आहे. ते पोहोचतपर्यंत मुलांना चाईल्ड लाईनच्या स्वाधिन करण्याची तयारी केली जात आहे.

### छळाला कंटाळून ३ महिन्यांपूर्वी सोडले घर

सचिन सध्या एका काँक्रीट मिक्सर वाहनावर काम करतो. पोलिसांनी सांगितले की, चारित्र्यावर संशय घेऊन तो नेहमी अंकिताशी भांडत होता. तो सतत अंकिताचा छळ करीत होता. शेवटी कंटाळून तीन महिन्यांपूर्वी अंकिताने घर सोडले आणि पांढराबोडीमध्ये एका नातेवाईकाच्या घरी राहायला गेली. तिला एका सुरक्षा रक्षक कंपनीत नोकरीही मिळाली. शिवणगाव फाट्यावर सुरू असलेल्या सीमेंट रोडच्या कामावर तिला तैनात करण्यात आले होते. मंगळवारी दुपारी ३ वाजताच्या सुमारास सचिन दोन्ही मुलांसह अंकिताला भेटायला तेथे गेला. तिला चांगलेच फटकारत सोबत येण्यास म्हटले. अंकिताने त्याला येण्यास नकार दिला. तिला भीती होती की, परत गेल्यास सचिन पुन्हा चारित्र्यावर संशय घेऊन तिचा छळ करेल.

# घरातील कत्तलखान्यावर पोलिसांची धाड

**नागपूर,** क्राईम रिपोर्टर. घरातच कत्तलखाना चालवणाऱ्या एका व्यक्तीवर यशोधरानगर पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारावर धाड टाकली. यावेळी त्याने निर्दयतापूर्वक ३६ गोवंशांना तेथे बांधून ठेवल्याचे आढळले. त्याच्याकडे त्या गोवंशांच्या खरेदी-विक्रीचे कोणतेही कागदपत्र नव्हते. पोलिसांनी गोवंशांची सुटका करीत त्या व्यक्तीला अटक केली. वकील कुरेशी इब्राहिम कुरेशी (५२) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. माजरीच्या शिवनगर परिसरात राहणारा आरोपी वकील हा अनेक दिवसांपासून गो तस्करीत सक्रिय आहे. त्याने मोठ्या संख्येत गोवंशांना आपल्या घरात निर्दयतापूर्वक बांधून ठेवले आहे. तो घरातच त्यांची कत्तल करतो, अशी माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर मंगळवारी सकाळी ६.३० वाजताच्या सुमारास पोलिसांनी त्याच्या घरावर धाड टाकली. वकील घरासमोरच मिळाला. पंचासमोर त्याच्या घराची झडती घेतली असता १३ गाय आणि २३ बैल मिळाले. त्यांना चारा-पाणी देता निर्दयतेने बांधून ठेवण्यात आले होते. त्या सर्वांची सुटका करून बिडगावच्या पशूपालन बहुद्देशीय संस्थेत ठेवण्यात आले आहे. वकील विरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून अटक करण्यात आली. ही कारवाई डीसीपी चिन्मय पंडित आणि एसीपी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनात पोनि विश्वनाथ चव्हाण, प्रशांत जुमडे, सपोनि सुरेश कन्नाके, पोहवा अजय कुटे, शोएब शेख, रोहित रामटेके, अमित ठाकूर आणि दुर्गेश शुक्ला यांनी केली.

## गीत गायन, नृत्य स्पर्धा उत्साहात

**नागपूर.** आकार मल्टीपर्पज फाउंडेशन च्यावतीने शंकरनगर येथील शेवाळकर सभागृहात २६ जून रोजी गीत गायन व नृत्य स्पर्धा यशस्वीपणे पार पडली. स्पर्धेचे परीक्षक कत्थक विशारद अपूर्वा काकडे, शास्त्रीय संगीत विशारद श्रद्धा चिंचाळकर, २०२१ ची मिसेस हिरकणी कुमुद चौखांद्रे आणि स्वयंसेवी संजय कटकमवार उपस्थित होते. एकल नृत्य स्पर्धेची विजेता तक्षिता परतेकी, नीरज निरापुरे समुह नृत्य स्पर्धेचे विजयता डॉ. नितिन मसराम आणि संच, गीत गायनाचे विजेते कल्याणी निनावे ठरले.

## क्राईम कॉर्नर

### ३,३०६ वाहन चालकांवर कारवाई

**नागपूर.** वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण ३,३०६ वाहन चालकांवर कारवाई करून २,५५,६५० रुपयांचा दंड वसूल केला. तसेच मुंबई दारूबंदी कायद्यान्वये ६ प्रकरणात ६ आरोपींना अटक करून ३,८४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तर जुगार कायद्यान्वये २ प्रकरणात ३ आरोपींना अटक करून १७,०१० रुपयांचा माल जप्त केला. वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली. या पुढेही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात येणार असून वाहनचालकांनी वाहन चालविताना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे आवाहन वाहतूक शाखेतर्फे नागरिकांना करण्यात आले आहे.

### सव्वा लाखाच्या दागिन्यांवर डल्ला

**नागपूर,** क्राईम रिपोर्टर. कळमनाच्या बेलेनगरात अज्ञात आरोपीने एका घराचे कुलूप तोडून १ लाख २५ हजार रुपयांच्या मालावर हातसाफ केला. या प्रकरणी पोलिसांनी मोहम्मद आसिफ अब्दुल रशीद (४२) रा. बेलेनगर, जुनी कामठी रोडच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

गत १६ जूनला आसिफ घराला कुलूप लावून कुटुंबासह शहरातून बाहेर गेले होते. ही संधी साधून अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. कपाटातील १ लाख २५ हजार रुपये किंमतीचे सोन्याचांदीचे दागिने चोरी करून पसार झाला. आसिफ घरी परतले असता त्यांना चोरी झाल्याचे समजले. त्यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

### गोदामाची भिंत पाडून लाखोंचा माल चोरी

**नागपूर,** क्राईम रिपोर्टर. अज्ञात आरोपींनी एका किराणा व्यापाऱ्याच्या गोदामाची भिंत पाडून ४.४२ लाख रुपयांच्या मालावर हातसाफ केला. ही घटना वाडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी स्वप्निल अनिल रेंगुडवार (३८) रा. मनीषनगरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

स्वप्निल यांचा खडगाव मार्गावरील सोनबानगरात साई समर्थ इंटरप्रायझेस नावाने किराणा सामानाचा व्यवसाय आहे. बाजूलाच त्यांचे गोदामही आहे. रविवारी मध्यरात्री अज्ञात आरोपींनी गोदामाची भिंत पाडून आत प्रवेश केला. तेलाचे पीपे, साखरेचे पोते, डाळीची पाकिटे व इतर किराणा सामान असा एकूण ४.४२ लाख रुपयांचा माल चोरी करून पसार झाले. दुसऱ्या दिवशी स्वप्निल गोदामात गेले असता चोरी झाल्याचे समजले. त्यांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## एमरेक्स फसवणूक प्रकरणात एकाला जामीन

**नागपूर,** क्राईम रिपोर्टर. विविध योजनांमध्येगुंतवणूककरून बक्कळनफा कमावण्याचे आमिष दाखवून एमरेक्स ट्रेड मनी कंपनीने शहरातील लोकांची कोट्यवधीरुपयांनीफसवणूककेली. या प्रकरणात आरोपी विनोद दादा उपरे (५०) रा. खामला यास एमपीआयडीच्या विशेष न्यायालयाचे न्यायाधीश ए.डी. साळुंखे यांनी जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणात विनोद उपरेसह आणखी तीन आरोपी आहेत.

उपरेचे वकील कमल सतुजा आणि कैलाश डोडानी यांनी न्यायालयाला सांगितले, या संपूर्ण प्रकरणात त्याला चुकीच्या पद्धतीने अडकविण्यात आले आहे. जेव्हाकी तो स्वत: पीडित आहे आणि त्यानेही मोठी रक्कम कंपनीत गुंतविली होती. त्यालाही त्याची रक्कम परत मिळालेली नाही. पोलिसांनी या प्रकरणात आरोप पत्र दाखल केले आहे. त्यात कोणत्याही गुंतवणूकदाराने हे म्हटले नाही की, उपरे यांनी त्यांच्याकडून पैसे घेतले होते. पोलिसांनी उपरेला कंपनीचा निदेशक दाखविले आहे. मात्र तो कोणत्याही पदावर कार्यरत नव्हता. पोलिसांचा तपास पूर्ण झाला आहे आणि आता काहीही जप्त करायचे राहिलेले नाही. अशात उपरेला ताब्यात ठेवण्याचे कोणतेही कारण नाही. सरकारी वकील अभय जिकार यांनी हे प्रकरण गंभीर असल्याचे सांगून जामीन देण्यास विरोध केला. आरोपीला जामीन मिळाल्यास तपास प्रभावित होऊ शकतो असे त्यांनी न्यायालयाला सांगितले. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने उपरेला सशर्त जामीन मंजूर केला.

## प्रतिभेतून प्रतिमेकडे कार्यक्रम उद्या

**नागपूर.** विदर्भ साहित्य संघ आणि सर्जना निर्माण यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या चित्र-शिल्पसग्रहण व्याख्यानमालिकेतील पंधरावा कार्यक्रम विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक संकुलातील चौथ्या मजल्यावरील कलादालनात ३० जून रोजी सायंकाळी ६.४५ वाजता होईल. हा दिवस आषाढातील पहिला दिवस असून महाकवी कालिदासाच्या स्मृतिप्रीत्यर्थ साजरा केला जातो. यास्तव महाकवी कालिदासाच्या काव्य - नाटकांवर प्रतिभावान चित्रकारांनी काढलेली चित्रे हा या कार्यक्रमाचा विषय आहे. प्रतिभेतून प्रतिमेकडे या शीर्षकाखाली होणाऱ्या या कार्यक्रमात संस्कृतच्या अभ्यासक डॉ. प्रज्ञा देशपांडे ह्या ऋतुसंहार या काव्यावर काढलेल्या भारतीय लघुचित्रांवर बोलतील. महाकवी कालिदासाच्या मेघदूतम् या काव्यावर रामगोपाल विजयवर्गीय यांनी काढलेल्या चित्रांवर प्रकाश एदलाबादकर मनोगत व्यक्त करतील तर, अभिज्ञान शाकुंतलम् या नाटकावर राजा रविवर्मा यांनी काढलेल्या चित्रांवर प्रा. चंद्रकांत चन्ने भाष्य करतील.

---

**एल&टी फायनान्स लिमिटेड**
**नोंदणीकृत कार्यालय:** 15वा मजला, पीएस श्रीजन टेक पार्क, प्लॉट नं. 52, ब्लॉक डीएन, सेक्टर त, सॉल्ट लेक सिटी कोलकाता 700 091, जिल्हा 24-परागणा उत्तर.
**CIN No.:** U65910WB1993FLC060810
**शाखा कार्यालय:** रायपूर/नागपूर

L&T Financial Services

### ताबा सूचना
### [नियम-८(१)]

जसे की, खालील स्वाक्षरी करणार एल&टी फायनान्स लिमिटेडचा(आधीचे नाव: एल&टी हाउसिंग फायनान्स लि. ही एनसीएलटी मुंबई आणि एनसीएलटी कोलकाता ह्यांनी मंजूर केलेल्या अॅब्सॉर्पशनद्वारे मर्जरमधून संलग्न होण्याच्या योजनेअंतर्गत एल&टी फायनान्स लि. सोबत संलग्न झाली आहे, एल&टी हाउसिंग फायनान्स लिमिटेड ही एल&टी फायनान्स लिमिटेडसोबत ('एलटीएफ') १२ एप्रिल २०२१ पासून संलग्न झाली आहे) अधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेटस आणि एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियम, २००२ [नियम ३] सोबत वाचले असता सदर कायद्यातील कलम १३(१२) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून एक मागणी सूचना जारी केली असून त्याद्वारे कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्स यांना सदर सूचना मिळाल्यापासून ६० दिवसांचे आत खाली नमूद करण्यात आलेल्या मागणी सूचनेत नमूद करण्यात आलेली रक्कम व मागणी सूचनेच्या तारखेपासून ते पैसे भरेपर्यंत/वसूल होईपर्यंत त्यावरील अधिक व्याज आणि इतर शुल्क इतक्या रकमेची परतफेड करण्यास सांगितले होते. कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्स यांनी सदर रकमेची परतफेड न केल्यामुळे ह्याद्वारे कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्स यांना आणि सर्वसाधारण जनतेला ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की खालील स्वाक्षरी करणार यांनी ह्या सूचने संदर्भात सदर नियम कमल ८ सोबत वाचले असता सदर कायद्यातील कलम १३ अन्वये त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे खाली वर्णन करण्यात आलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे. कर्जदार/सह-कर्जदार/गॅरंटर ह्यांचं लक्ष वेधलं जात आहे सदर कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम ८ नुसार, उपलब्ध वेळेत, सिक्युअर्ड मालमत्ता सोडवून घ्यावी.

| कर्ज खाते क्रमांक | कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्सचे नाव | गहाण मालमत्तेचा तपशिल | मागणी सूचना | | ताबा घेतल्याची तारीख व प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| | | | दिनांक | थकित रक्कम(₹) | |
| H013173112200 75517 H014023112200 80243 | १. शोभना बैद<br>२. संतोष बैद<br>३. मेसर्स फायबर अँड फायबर | ह्या मालमत्तेचा प्रत्येक आणि सर्व भाग: पत्ता-केएच नं.७०४/२, ७०५/१-२-३ चा भाग, बंगला नं.४०, प्लॉटचं क्षेत्रफळ १८०३.३३ चौरस फूट. तळमजल्यावर बांधकाम केलेलं क्षेत्रफळ-१०११.९७ चौरस फूट, पहिला मजला-९७८.८२ चौरस फूट, दुसरा मजला-३३२.७५ चौरस फूट, मौजा-अशोका आयकन फेज-१ येथे स्थित, निवासी बंगले/हाउसेस मोवा, पी.एच.नं.१०९, आरआयसी-रायपूर-१, डॉ.भिमराव अंबेडकर वॉर्ड नं. २७, आर.एन.एम रायपूर-१, तहसिल आणि जिल्हा-रायपूर - (C.G.) ४९२ ०१४ | १६-०२-२०२२ | रु.१,३१,८५,३९२.४४/- १४-०२-२०२२ रोजी | २३-०६-२०२२ प्रतिकात्मक ताबा |

कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्स यांना खास करून आणि सर्वसाधारण जनतेला याद्वारे सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार न करण्याची खबरदारीची सूचना देण्यात येत आहे आणि सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार केल्यास तो एल&टी फायनान्स लिमिटेड यांना मागणी सूचनेत नमूद करण्यात आलेली रक्कम आणि त्यासोबत मागणी सूचनेपासून ते पैसे अदा करेपर्यंत/वसूल होईपर्यंत अधिक व्याज व इतर शुल्क इत्यादी भरण्याच्या अधीन असेल.

**दिनांक:** 29.06.2022
**स्थान:** रायपूर/नागपूर

स्वाक्षरी/-
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

---

SARDA ENERGY & MINERALS LTD.

# SARDA ENERGY & MINERALS LIMITED

**Corporate Identification Number (CIN): L27100MH1973PLC016617**
**Registered Office:** 73-A, Central Avenue, Nagpur, Maharashtra, 440018. **Tel No.:** 0712-2722407
**Office:** Industrial Growth Center, Siltara Raipur (C.G.) 493111 | **Tel. No.:** +91 771 2216100; **Fax:** +91 7712216198
**Contact Person:** Mr. Manish Sethi, Company Secretary and Compliance Officer; **Email:** cs@seml.co.in; **Website:** www.seml.co.in

**POST BUY BACK PUBLIC ANNOUNCEMENT FOR THE ATTENTION OF THE EQUITY SHAREHOLDERS/ BENEFICIAL OWNERS OF THE EQUITY SHARES OF SARDA ENERGY & MINERALS LIMITED**

This public announcement (the **"Post Buyback Public Announcement"**) is being made in compliance with Regulation 24(vi) of the Securities and Exchange Board of India (Buy-Back of Securities) Regulations, 2018 as amended from time to time (the **"Buyback Regulations"**). This Post Buyback Public Announcement should be read in conjunction with the Public Announcement dated April 25, 2022 published on April 26, 2022 (the **"Public Announcement"**) and the Letter of Offer dated May 25, 2022 (the **"Letter of Offer"**). The terms used but not defined in this Post Buyback Public Announcement shall have the same meanings as assigned in the Public Announcement and/or the Letter of Offer.

**1. THE BUY BACK**

SARDA ENERGY & MINERALS LIMITED (the **"Company"**) had announced the Buyback of up to 8,11,108 (Eight Lakh Eleven Thousand One Hundred Eight) fully paid-up equity shares of face value of Rs. 10/- (Rupees Ten Only) each (**"Equity Shares"**) from the existing shareholders/beneficial owners of Equity Shares holding Equity Shares as on the Record Date (i.e. May 6, 2022), on a proportionate basis, through the "Tender Offer" route through the Stock Exchange mechanism, as prescribed under the Buyback Regulations, at a price of Rs. 1,500/- (Rupees One Thousand Five Hundred Only) per Equity Share payable in cash, for an aggregate consideration not exceeding Rs. 121,66,62,000/- (Rupees One Hundred Twenty One Crore Sixty Six Lakhs Sixty Two Thousand Only), excluding Transaction Cost (**"Buyback Size"**). The Buyback Size constituted 6.06% and 5.49% of the paid-up equity share capital and free reserves as per the latest standalone and consolidated audited balance sheet of the Company, respectively, for the financial year ended March 31, 2021 and was within the statutory limit of 10% under the Companies Act, 2013 (the **"Act"**) and represents 2.25% of the total number of equity shares in the total paid-up equity share capital of the Company.

1.1 The Company has adopted the Tender Offer route for the purpose of the Buyback. The Buyback was implemented using the "Mechanism for acquisition of shares through Stock Exchange" notified by Securities and Exchange Board of India (**"SEBI"**) vide circular CIR/CFD/ POLICYCELL/1/2015 dated April 13, 2015 read with SEBI Circular CFD/DCR2/CIR/P/2016/131 dated December 9, 2016 and SEBI Circular SEBI/HO/CFD/DCR-III/CIR/P/2021/615 dated August 13, 2021, including any amendments or statutory modifications for the time being in force.

1.2 The Buy Back Offer was kept open from Thursday, June 02, 2022 to Wednesday, June 15, 2022.

**2. DETAILS OF THE BUYBACK**

2.1 8,11,108 (Eight Lakh Eleven Thousand One Hundred Eight) Equity Shares were to be bought back under the Buyback, at a price of Rs. 1500/- (Rupees One Thousand Five Hundred Only) per Equity Share.

2.2 The total amount to be utilized in the Buyback was Rs. 121,66,62,000/- (Rupees One Hundred Twenty One Crore Sixty Six Lakhs Sixty Two Thousand Only), excluding Transaction Cost.

2.3 The Registrar to the Buy Back i.e. Big Share Services Pvt. Ltd (**"Registrar"**), considered 22335 valid applications for 11860267 Equity Shares in response to the Buy Back offer resulting in the subscription of approximately 14.62 times. The details of valid applications considered by the Registrar, are as follows:

| Category | No. of Equity Shares Reserved in the Buyback | No. of Valid applications | Total Equity Shares Validly Tendered | No. of Equity shares accepted | % Response |
|---|---|---|---|---|---|
| Reserved category for Small Shareholders | 1,21,667 | 18684 | 277435 | 121667 | 228.03% |
| General Category for all other Equity Shareholders | 6,89,441 | 3651 | 11582832 | 689441 | 1680.03% |
| **Total** | **8,11,108** | **22335** | **11860267** | **811108** | **1462.23%** |

2.4 All valid applications were considered for the purpose of Acceptance in accordance with the Buyback Regulations and the Letter of Offer. The communication of acceptance/ rejection will be dispatched by the Registrar to the eligible Equity Shareholders on or before June 28, 2022 (by email where the email id is registered with the Company or the depository). In cases where email IDs are not registered with the Company or depositories, physical letters of acceptance / rejection will be dispatched to the Eligible Shareholders by the Registrar

2.5 The settlement of all valid bids was completed by the National Clearing Corporation Limited on June 27, 2022. The Clearing Corporation has made direct funds payout to Eligible Shareholders whose shares have been accepted under the Buyback. If the Eligible Shareholders bank account details were not available or if the funds transfer instruction was rejected by Reserve Bank of India/Relevant Bank, due to any reason, such funds were transferred to the concerned Shareholder Brokers settlement bank account for onward transfer to such Eligible Shareholders.

2.6 Demat Equity Shares accepted under the Buyback were transferred to the Company's demat escrow account on 27th June, 2022. The unaccepted/excess demat Equity Shares have been returned to the respective Eligible Shareholders/lien removed by Clearing Corporation on 27th June, 2022. 15 bids for 1450 Physical Shares were received out of which 218 Equity Shares have been accepted and the Letter of Confirmation in compliance with SEBI Circular no. SEBI/HO/MIRSD_RTAMB/P/CIR/2022/8 dated January 25, 2022 were dispatched to the Registered address of the Eligible Shareholders.

2.7 The extinguishment of 8,11,108 Equity Shares accepted under the Buy Back is currently under process and shall be completed on or before July 04, 2022.

2.8 The Company, and its respective directors, accept responsibility for the obligations of the Company laid down under the Buyback Regulations.

**3. CAPITAL STRUCTURE AND SHAREHOLDING PATTERN**

3.1 The capital structure of the Company, pre and post Buy Back is as under:

| Sr. No. | Particulars | Pre Buyback (As on the Record Date) | | Post Buyback[1] | |
|---|---|---|---|---|---|
| | | No. of Shares | Amount (Rs. Lacs) | No. of Shares | Amount (Rs. Lacs) |
| 1. | Authorized Share Capital | 5,00,00,000 | 5,000.00 | 5,00,00,000 | 5000.0000 |
| 2. | Issued, Subscribed and Paid up Capital | 3,60,49,235 | 3,604.9235 | 3,52,38,127 | 3,523.8127 |

[1]Subject to extinguishment of 8,11,108 Equity Shares

3.2 Details of Eligible Shareholders from whom Equity Shares exceeding 1% of the total Equity Shares bought back have been accepted under the Buyback Offer are as under:

| Sr. No. | Name of Shareholder | Number of Equity Shares accepted under the Buyback | Equity Shares accepted as a % of total Equity shares bought back | Equity Shares accepted as a % of total Post Buyback Equity Shares[1] |
|---|---|---|---|---|
| 1. | CHHATTISGARH INVESTMENTS LIMITED | 281267 | 34.68 | 0.80 |
| 2. | SARDA AGRICULTURE & PROPERTIES (P) LTD. | 53283 | 6.57 | 0.15 |
| 3. | UMA SARDA | 35358 | 4.36 | 0.10 |
| 4. | K K SARDA FAMILY TRUST - TRUSTEE - UMA SARDA | 28455 | 3.51 | 0.08 |
| 5. | ANANT SARDA | 23000 | 2.84 | 0.07 |
| 6. | Manish Jugalkishore Sarda | 22119 | 2.73 | 0.06 |
| 7. | NEERAJ SARDA | 22119 | 2.73 | 0.06 |
| 8. | PANKAJ SARDA | 19666 | 2.42 | 0.06 |
| 9. | GHANSHYAM RAMKISHORE SARDA | 18188 | 2.24 | 0.05 |
| 10. | ABAKKUS EMERGING OPPORTUNITIES FUND-1 | 17224 | 2.12 | 0.05 |
| 11. | KAMAL KISHORE SARDA | 16063 | 1.98 | 0.05 |
| 12. | VIPULA SARDA | 12026 | 1.48 | 0.03 |

[1]Subject to extinguishment of 8,11,108 Equity Shares

3.3 The Shareholding Pattern of the Company, pre and post Buyback, is as under:

| Category of Shareholder | Pre Buyback (As on the Record Date) | | Post Buyback[1] | |
|---|---|---|---|---|
| | Number of Shares | % to the existing Equity Share capital | Number of Shares | % to post Buyback Equity Share capital |
| Promoter / Promoter Group | **2,61,34,360** | 72.50 | **25597426** | 72.64 |
| Foreign Investors (including Non Resident Indians/FIIs/FPIs/Foreign Nationals/OCBs) | **8,53,093** | 2.37 | **842068** | 2.39 |
| Financial Institutions/Banks/ NBFCs and Mutual Funds/Insurance Companies | **250** | - | **250** | - |
| Others (Public, Bodies Corporate, Clearing Members, Trust, HUF, etc.) | **90,61,532** | 25.13 | **8798383** | 24.97 |
| | **3,60,49,235** | 100.00 | **3,52,38,127** | 100.00 |

[1] Subject to extinguishment of 8,11,108 Equity Shares

**4. MANAGER TO THE BUYBACK OFFER**

Hem Securities Ltd.

**Hem Securities Limited**
**Address:** 904,A Wing, Naman Midtown, Senapati Bapat, Marg, Elphinstone Road, Lower Parel, Mumbai-400013, India
**Tel:** +91-022-49060000: **Fax:** +91-022-22625991; **Contact Person:** Mrs. Roshni Lahoti; **E-mail:** ib@hemsecurities.com
**Website:** www.hemsecurities.com; **SEBI Registration Number:** INM000010981; **CIN:** U67120RJ1995PLC010390

**5. DIRECTORS' RESPONSIBILITY**

5.1 As per Regulation 24(i)(a) of the Buyback Regulations, the Board of Directors accepts full responsibility for the information contained in this Post Buyback Public Announcement and for the information contained in all other advertisements, circulars, brochures, publicity materials etc. which may be issued in relation to the Buyback and confirms that the information in such documents contains and will contain true, factual and material information and does not and will not contain any misleading information.

For and on behalf of the Board of Directors of
**SARDA ENERGY & MINERALS LIMITED**

| Sd/- | Sd/- | Sd/- |
|---|---|---|
| Name- Kamal Kishore Sarda | Name- Pankaj Sarda | Name- Manish Sethi |
| (Chairman and Managing Director) | (Jt. Managing Director) | (Company Secretary) |
| DIN: 00008170 | DIN: 00008190 | Membership No.: 18069 |

Date: June 28, 2022

Sunjeet Comm.